# भाजप सर्वात मोठा पक्ष कार्यकर्त्यांमुळेच झाला : भंडारी

## भाजपचा स्थापना दिन उत्साहात साजरा

सुराज्य/सोलापूर

भाजप हा पक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून तयार झालेला आहे. कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून उभा असलेला देशातील सर्वात मोठा पक्ष असल्याने भाजपा सर्वसामान्यांचा पक्ष म्हणून म्हणून भारतीय जनता पार्टीकडे पाहिले जात आहे दोन खासदारापासून ३०३ खासदारांपर्यंत भाजपाने मजल मारली आहे ती फक्त कार्यकर्त्यांच्या जोरावरच. आगामी काळातही कार्यकर्त्यांनी गाफिल न राहता केंद्र व राज्य सरकारच्या अनेक लोकाभिमुख योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी परिश्रम घ्यावे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी केले.

भाजपच्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून आमदार विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील व्यापाऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकारने सादर केलेल्या विविध योजनांची व तरतुदींची माहिती देण्यासाठी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांच्या व्याख्यानाचे आयोजन भवानी पेठेतील माहेश्वरी सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, शहराध्यक्ष विक्रम देशमुख, यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, गणपत मिरजकर, गिरीश देवरमणी, सिद्धया स्वामी, नरेंद्र गंभीरे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

केंद्र सरकार असो अथवा राज्य सरकार असो अर्थसंकल्पातील प्रत्येक योजनेचा थेट लाभ सर्वसामान्य नागरिक व्यापारी उद्योजकांना पोहोचवणारे हे सरकार आहे केंद्र सरकारने आत्तापर्यंत दीडशेपेक्षा जास्त योजना लागू करत सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. 'बोलून न दाखवता सत्तेचा उपयोग व अर्थसंकल्पाचा फायदा सर्व समाज घटकापर्यंत अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पोचवणारे हे सरकार आहे, असे भंडारी म्हणाले.'

आमदार विजयकुमार देशमुख यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, महेश तापडिया, अशोक संकलेचा, पापाशेट दायमा, सुभाष महेश, गिरधारी भुतडा, भैय्या दास, श्रीनिवास दायमा, तुळशीदास भुतडा, प्रकाश हत्ती, बसवराज इटकळे, नरेंद्र काळे, संजय कोळी, राजाभाऊ काकडे, महालिंगप्पा परमशेट्टी, यल्लाप्पा यलदी, अशोक चव्हाण, प्रकाशसा झाड, प्रभू विभूते, नागनाथ येले, बसवराज इटकळे, विरेश उंबरचे, प्रसाद कुलकर्णी, देविदास चेळेकर, राजकुमार पाटील, संजय कणके, गणेश साखरे व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन सरोजिनी मुनेटी यांनी केले तर आभार भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष नरेंद्र काळे यांनी मानले.




## आ. देशमुखांविरोधात राष्ट्रवादी महिला आघाडीची निदर्शने

सुराज्य/सोलापूर : भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांनी महिलांचा आवमान केला आहे. त्यामुळे महिलांची माफि मागावी या मागण्यासाठी शहर राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्यावतीने शहराध्यक्ष सुनीता रोटे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. आ. देशमुख यांनी दक्षिण सोलापूर येथील कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत बोलताना महिलांना लाजा वाटेल, असे विधान केले आहे. यामुळे समस्त महिलावर्गाचा अवमान झाला आहे. यांच्या निषेर्धात हे आंदोलन करण्यात आले.

भाजपचे आमदार, पदाधिकारी हे महिलांची बदनामी नियमित करत आहेत. यापूर्वी असे अनेक प्रकार घडले आहेत. यामध्ये भाजपच्या सोलापूरच्या आमदारांची भर पडली आहे. देशमुख यांनी माफि मागावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शहराअध्यक्ष सुनीता रोटे यांनी यावेळी दिला. यावेळी शशिकला कसपटे, लता फुटाणे, नसीमा शेतसंधी, सिया मुलाणी, सुनीता साठे, सुनीता गायकवाड, आशालता दीक्षित, ज्योती कांबळे, कुंदन कांबळे, गीता भोसले, सुनंदा पाटील, योगिता भालेकर, किरण मोहिते यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

# कुर्डूवाडीत आज जैन एकता महोत्सव

सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डूवाडी येथील श्री सन्मती सेवा दल बहुउद्देशीय अल्पसंख्याक संस्था आणि सकल जैन समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वोद्वय विश्वधर्माचे २४ वे तीर्थंकार श्री १००८ भगवान महावीर यांच्या २६२२ वा जन्मकल्याण जैन ऐकता महोत्सव रविवारी ९ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून दुपारी ३ वाजेपर्यंत कुर्डूवाडी येथील आंतर भारती विद्यालयाच्या मैदानात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यासाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान स्वागत अध्यक्ष सुहास शहा यांनी केले आहे.**

रविवारी सकाळी ७ वाजता जैन मंदिर येथून भव्य शोभायात्रा निघणार असून यावेळी मंदीरावरील ध्वजारोहण राजेश गांधी, शोभायात्रा उद्घाटन महेश गांधी यांच्या हस्ते होणार आहे. या मिरवणूक रथ बगी, अश्व, हत्ती व विविध सामाजिक संदेश देणारे फलक, बँड पथक, महिला, पुरुष मुले, मुली मोठ्या संख्येने उपस्थित राहुन शोभायात्रा सुरू होईल.

यावेळी भगवान महावीराची प्रतिमा हत्तीवर विराजमान करण्यासाठी विलास जयकुमार दोशी यांच्या हस्ते होणार आहे. ही शोभायात्रा जैन मंदिर, संभाजी चौक, पंजाब तालीम, पोस्ट रोड, नवी पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक, टिळक चौक, स्टेशन रोड, कुर्डूवाडी पोलीस स्टेशन रेल्वे गेट, टेंभुर्णी रोड मार्गे अंतर भारती प्रशालेच्या मैदानात जाणार असून त्या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेसाठी उद्योजक महेश गांधी, ऑ. प्रमोद पलसे, महिंद्र मेहता उपस्थित होते. यावेळी मुनीश्री १०८ सागर महाराज व मुनीश्री १०८ पुराण सागरजी महाराज यांचे प्रवचन होणार आहे.


या कार्यक्रमासाठी श्री अनंतनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट, श्री महावीर मंडळ, श्री सन्मती सेवा दल व महिला मंडळ, श्री वर्धमान जैन श्रावक संघ, श्री चंदनबाला व सुशीला बहुउद्देशीय महिला मंडळ, श्री मुनीसुव्रत स्वामी श्वेतांबर जैन मंदिर, भारतीय जैन संघटना व श्री महावीर वाचनालयतर्फे सहपरिवार उपस्थित राहून शोभा वाढवण्याची विनंती केली आहे.

### हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

कुर्डूवाडी येथील जैन मंदिरावर व मिरवणुकीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी सकाळी ११ वाजता सराफ व्यापारी चेतन शहा व त्यांच्या पत्नी वैशाली शहा यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर, मुंबई, पुणे, सातारा, बीड, उस्मानाबाद, अहमदनगर अशा सात जिल्ह्यातून जैन समाज बांधव उपस्थित राहणार आहेत.

## हिळ्ळी बंधाऱ्यातून होणारी पाणी गळती रोखण्याची मागणी

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुक्यातील हिळ्ळी बंधारा सध्या उजनीतून सोडलेल्या पाण्यामुळे शंभर टक्के भरले आहे. मात्र सध्या बंधाऱ्यातून मोठ्याप्रमाणात पाणी गळती होत असल्याने या भागातील शेतकरी, सामान्य नागरिक मात्र हतबल झाले आहेत. तरी होणारी पाणी गळती त्वरीत रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी हिळ्ळी ग्रामपंचायतीच्यावतीने करण्यात आले.

हिळ्ळी गावचे सरपंच, उपसरपंच व प्रतिष्ठित ग्रामस्थ मिळून संबंधित भिमा विकास प्रकल्प विभाग क्र. ५ यांच्याकडे निवेदन सादर करुन व्यथा मांडली आहे. तीव्र उन्हाळ्यात पाण्याची नितांत गरज असताना हिळ्ळी भागातील शेतकरी, सामान्य नागरिकांनी संबंधित भीमा विकास प्रकल्पाकडे उजनी धरणातून हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत पाणी सोडण्याची मागणी केली होती. तेव्हा संबंधित विभागानी याची दखल घेत तीव्र उन्हाळ्यात भीमा नदीतून हिळ्ळी बंधार्यापर्यंत पाणी सोडून या भागातील नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे.

परंतु बंधाऱ्याला मोठी गळती सुरु झाल्याने सध्या मोठ्या प्रमाणात पाणी खाली वाया जात आहे. तरी संबंधित विभागांनी याची त्वरीत दुरुस्ती करुन पाणी गळती रोखण्याची मागणी या भागातील शेतकरी करीत आहेत.



## वेळापूर मल्टी स्पेशालिटीतर्फे प्रा. धनंजय साठे यांचा सत्कार

सुराज्य/वेळापूर : रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथील इंग्रजी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक व उघडेवाडी गावचे रहिवासी प्रा. धनंजय साठे यांना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठाची इंग्रजी विषयाची पीएच. डी. (डॉक्टरेट) पदवी प्राप्त झाल्याबद्दल प्राध्यापक धनंजय साठे यांचा वेळापूर मल्टी स्पेशालिटीतर्फे सत्कार करण्यात आला. हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. जयंत चव्हाण, डॉ. उदय माने देशमुख, डॉ. उमेश नाईक, डॉ. दिलीपतात्या पवार डॉ. अमर माने देशमुख, डॉ. सोमनाथ माने देशमुख, डॉ. पांडुरंग देवकते, डॉ. अमोल कोळेकर, डॉ. रोहित माने देशमुख, डॉ. सागर पवार यांच्यावतीने सत्कार करण्यात आला व यावेळी उद्योजक रायचंद खाडे, माजी उपसरपंच नितीनकुमार चौगुले, प्रदीप सरवदे व अनिल घाडगे उपस्थित होते. धनंजय साठे यांनी सर्वांचे आभार मानले.

## गतीमंद महिलेवर अत्याचार आरोपीचा शोध सुरु

सुराज्य/सोलापूर

एका ३५ वर्षाच्या गतीमंद महिलेवर अज्ञात इसमाने पीडित महिला मानसिक व शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याचा गैरफायदा घेऊन तिच्याशी अनैतिक शारीरिक संबंध ठेवून ती पीडित महिला २१ आठवड्याची गरोदर राहिल्याची घटना उघडकीस आली आहे. दरम्यान तिच्यावर उपचार करताना पीडित महिला ही गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पण याबाबत पीडित ही बोलण्याच्या मानसिकतेत नव्हती. यामुळे याप्रकरणी सदर बझार पोलिसांनी अज्ञात इसमावर गुन्हा दाखल केला आहे. शिवाय पीडितेवर सध्या उपचार सुरू आहेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# गौडगाव येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी

सुराज्य/अक्कलकोट

**तालुक्यातील गौडगाव येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या, दक्षिणमुखी श्री जागृत मारूती मंदिरात हनुमान जयंती भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी लाखो भाविकांनी रामभक्त हनुमान की जय, पवनसुत हनुमान की, 'जय जय बजरंग' अशा विविध घोषणा देत मारूती चरणी लिन झाले.**



जयंतीनिमित्त गुरुवारी पहाटे हनुमानच्या मूर्तीस महाभिषेक, होमहवन, हनुमान चालीसा, रामनामाचा जप व महाआरतीसह विविध पुजा करण्यात आला. यावेळी गाभारा व मूर्तीस फुलांची सुंदर सजावट करण्यात आली होती. पहाटेपासून अभिषेकाला प्रारंभ झाला. अन्नछत्र मंडळात महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, कार्याध्यक्ष सिद्राम वाघमोडे, सचिव प्रकाश म्हेत्रे, ज्ञानेश्वर फुलारी, परमेश्वर सुतार, परमेश्वर पाटील, बिराप्पा पुजारी, शांतय्या स्वामी, चौडप्पा सोलापुरे, रमेश वाघे, भिमराव बंडगर,भारत ननवरे, अमसिद्ध कोरे, श्रीमंत म्हेत्रे, भिमण्णा हडपद, मल्लीनाथ शेरीकर, मल्लीनाथ पाटील, सुभाष गोटूर, प्रकाश सनकळ आदींनी परिश्रम घेतले. गुरुवारी दुपारी १२ वाजता घंटानाद व काकड आरती पंढरपुर येथील विद्या प्रकाश कवडे या भाविकांच्या हस्ते पार पडला.

गजानन पवार, सचिन सूर्यवंशी, परमेश्वर सुतार, भुजबळ सर यांच्यावतीने हनुमान जयंती निमित्त येणाऱ्या अन्नदानाच्या स्वरूपात महाप्रसाद वाटप केले आहे.

## निधन वार्ता

### महेंद्र तोडकरी



सांगोला: सांगोला नगर परिषदेत अभियंता पदावर अनेक वर्षे सेवा दिलेले व सध्या विटा नगर परिषदेत अभियंता पदावर कार्यरत असणारे महेंद्र रामचंद्र तोडकरी (वय ५६) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना असा परिवार आहे.

### राजेंद्र हुलजंतीवाले

सोलापूर : लष्कर भागातील राजेंद्र हुलजंतीवाले यांचे बुधवारी अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, तीन बहिणी, पत्नी, मुली, मुले, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# न्यासातर्फे वाढदिवसानिमित्त म्हेत्रे यांचा सत्कार

सुराज्य/अक्कलकोट

**श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्यावतीने माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी अमोलराजे भोसले यांनीही वाढदिवसाप्रित्यर्थ म्हेत्रे यांना शुभेच्छा दिल्या.**



याप्रसंगी माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे, लाला राठोड, माजी नगरसेवक रामचंद्र समाणे, शिवराज स्वामी, सर्फराज शेख, मैनुद्दीन कोरबू, मुबारक कोरबू, सुनील इसापुरे, सोमनाथ चिकलंडे, सिद्धू म्हेत्रे, रुद्राय्या स्वामी, बसवराज डोंगरितोट व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, पुरोहित संजय कुलकर्णी, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, निखील पाटील, विराज माणिकशेट्टी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, देवराज हंजगे, शरदराव भोसले, शावरप्पा माणकोजी, शिवू काळे, विनायक तोडकर उपस्थित होते.

तालुक्याचे आमदार व माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी ६२ व्या वाढदिवसाप्रित्यर्थ श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. मंदिर समितीचे समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला.

याप्रसंगी प्रथमेश म्हेत्रे, सर्फराज शेख, शिवराज स्वामी, मंगल पाटील, रामचंद्र समाणे, मैनोदीन कोरबू, मुबारक कोरबू, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, महेश गोगी, संजय पवार, दिपक जरिपटके, रामचंद्र समाणे, सागर गोंडाळ, गिरीष पवार, श्रीशैल गवंडी, स्वामीनाथ लोणारी, संजय पवार आदी उपस्थित होते.

## मुलीने आई-वडिलांसह भावाविरुद्ध केला गुन्हा दाखल




सुराज्य/सोलापूर : मुलीने घरच्यांच्या विरोधात जाऊन केलेले लग्न मान्य न करत तिचे साहित्य चोरल्याप्रकरणी आई-वडिलांच्या विरोधात मुलीने फिर्याद दिली. अनुशा राजमौली वेल्दी ऊर्फ अनुशा नवल कोमाकुल (वय-२४, रा. गांधीनगर, अक्कलकोट रोड) आत्याच्या मुलाबरोबर लग्न केले. ते लग्न तिच्या आई-वडिलांना मान्य झाले नाही. त्यानंतर तिच्या आई-वडिलांनी तिचा लॅपटॉप, डिवाइस, मोबाईल, बँकेचे एटीएम कार्ड, पासबुक, शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड असलेली बॅग पळवली. अनुशा हिच्या फिर्यादीवरून वडील राजमौली वेल्दी, आई सुजाता वेल्दी, भाऊ अजयकुमार वेल्दी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत

## प्रा. डॉ. भरतकुमार सोलापुरे यांचे अर्थसंकल्पावर ऑनलाईन व्याख्यान



सुराज्य/सोलापूर : वसुंधरा कला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४ समजून घेताना या विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रा. डॉ. भरतकुमार सोलापुरे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने विद्यार्थी व प्राध्यापक यांना मौलिक मार्गदर्शन केले. त्यांनी सरकारचे राजकोषीय धोरण आणि धोरणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पातील तरतुदी महत्त्वाच्या ठरतात. अर्थसंकल्पाच्या उद्दिष्टात प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय, संस्कृतिक आणि पर्यावरणीय उद्दिष्टांचा समावेश अर्थसंकल्पात दिसून येतो आणि प्रत्येक सरकार या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्याच्या महत्त्वानुसार तरतुदी करताना दिसते. अर्थात, सरकारची अधिकची तरतूद ही सार्वजनिक कर्जावरील व्याज परताव्यासाठीच करावी लागते. देशाचे संरक्षण, अंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था या बाबी अर्थसंकल्पात प्रधान्याने विचारात घेताना कृषी, उद्योग, व्यापार, ग्रामीण विकास, वित्तीय क्षेत्र, कल्याणकारी योजना, अन्न सुरक्षा, रोजगार वृद्धिंच्या योजना इत्यादीबाबत अर्थसंकल्पाची फलनिष्पत्ती महत्त्वाची ठरते, असे मत व्यक्त केले.

अध्यस्थानी प्राचार्य डॉ. मीना गायकवाड होत्या. प्रास्ताविक प्रा. डॉ. राजाराम पाटील, परिचय प्रा. डॉ. तानाजी देशमुख, आभार डॉ. किशोर जोगदंड तर सूत्रसंचालन डॉ. संगीता भोसले यांनी केले.

# पापय्या तालीम संघात हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा

सुराज्य/सोलापूर

जुनी मिल कंम्पाऊंड येथील ऐतिहासिक पापय्या तालीम येथे हनुमान जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्री हनुमान मूर्तीची विधीवत पूजा तालमीचे नुतन वस्ताद गणेश कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.



जिल्हा सत्र न्यायाधीश गणेश पवार, दयानंद विधी महाविद्यालयचे प्रा. ॲड. अरविंद देडे व तसेच संस्थेचे अध्यक्ष- जगन्नाथ व्यवहारे, सेक्रेटरी- प्रदीप शिके यांच्या उपस्थितीत भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. जन्मोत्सव सोहळ्यादिवशी नगरसेवक देवेंद्र कोठे, विनायक कोंड्याल, परिवहन समितीचे अध्यक्ष राजन जाधव, युवानेते नागेश खरात, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, क्रिकेटपटू के. टी. पवार, ॲड. विक्रमसिंह काटुळे, ॲड. प्रवीण निकम, संघरक्षित ॲड. उडाणशिव, ॲड. विनायक वड्डेपल्ली, पत्रकार-शरद येच्चे आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली.

कार्यक्रमासाठी प्रकाश सुरवसे, गजानन लामकाने, शिवाजी चटके, किरण बायस, विजय पाटील, जयंत मोरे, पांडुरंग पवार, प्रकाश कदम, लक्ष्मण डोंगरे, दत्तात्रय पाटील, सुर्यकांत भगत, राजन व्यवहारे, अजित शिंदे, रणजीत खताळ, संभाजी मळगे, श्रीनिवास कोटा, जितेंद्र गुरबानी, परशुराम कोळी, इंद्रनिल पापरकर, प्रवीण सुरवसे, कन्हैय्या मुक्ता, राजकुमार माचकणूर, अतूल कोथिंबीरे, प्रथमेश पडवळकर, शुभम घोरपडे, शुभम इंगोले, ऋषिकेश चव्हाण, राकेश मेट्रे, तुकाराम राऊत इत्यादींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार मंगेश लामकाने यांनी केले.

### जि. प. आरोग्य विभागातर्फे

# 'सुंदर माझा दवाखाना' स्वच्छता मोहीम

सुराज्य/सोलापूर

**जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७ एप्रिल ते १४ एप्रिल २०२३ दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने सर्व आरोग्य संस्थांमध्ये 'सुंदर माझा दवाखाना' या संकल्पनेतून स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.**



यावर्षीचे जागतिक आरोग्य दिनाचे घोषवाक्य 'सर्वांसाठी समान आरोग्य सुविधा, सर्वांसाठी आरोग्य असून आरोग्यसेवा अधिकाधिक लोकभिमुख व्हावी, आरोग्यसेवा पुरवणारी संस्था भौतिक सोयी सुविधायुक्त राहावेत या अनुषंगाने राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्यावतीने जागतिक आरोग्य दिन ७ एप्रिलपासून आरोग्य संस्थांमध्ये 'सुंदर माझा दवाखाना' या उपक्रम राबवण्यात आले. हा उपक्रम १४ एप्रिलपर्यंत राबवण्यात येणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये राबविण्यात आले. या उपक्रमात स्वच्छतेवर भर देण्यात आला आहे.

या उपक्रमात आरोग्य संस्था सभोवतालचा परिसर, सर्व वार्ड विभाग, स्वच्छता गृह, भंडारगृहे इत्यादी स्वच्छता करण्यात आली. आरोग्य संस्थेच्या आवारात व दर्शनी भागात सुशोभिकरण रंगरंगोटी व जनतेला देण्यात येणाऱ्या सेवाचे फलक लावण्यात आले. या उपक्रमात जिल्ह्यातील ७७ प्राथ. आरोग्य केंद्र ४३१ उपकेंद्र या आरोग्य संस्थेत सहभागी झालेले होते.